# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**परिपत्रक**

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/परिपत्रक/2020/ 717

दिनांक:- 18/2/2020

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी,
पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- आपल्या शैक्षणिक संस्थेमध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्याबाबत.
संदर्भ:- उच्च व तंत्रशिक्षण विभाग म.रा., मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2020/प्र.क्र.60/ विशि-3, दि. 15 फेब्रुवारी 2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, आपल्या शैक्षणिक संस्थेमध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्याबाबत व ज्या संस्थेत इंग्रजी भाषेत नामफलक लावण्यात आलेले आहे तेथे सुध्दा इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचे नामफलक लावण्याबाबत संदर्भिय परिपत्रक शासनाने आदेश निर्गमित केलेले आहे (प्रत संलग्न)

आपणास कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे शैक्षणिक संस्थेमध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्यात यावे तसेच ज्या संस्थेत इंग्रजी भाषेत नामफलक लावण्यात आलेले आहे तेथे सुध्दा इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचे नामफलक लावण्यात यावे.

सर्व शैक्षणिक संस्थांकडून सदरहू शासन परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे याबाबतची खबरदारी सर्व प्राचार्य यांनी घ्यावी व त्याबाबतचा अहवाल **फोटोसह दि. 27/02/2020 पर्यंत** या कार्यालयाकडे सादर करावी.

सहपत्र:- संदर्भिय शासन परिपत्रक

**(डॉ. राम निबुदे)**
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. 2अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण - २०२०/प्र.क्र.६०/विशि-३,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १५ फेब्रुवारी, २०२०.

<u>परिपत्रक:-</u>

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये नामफलक तसेच संस्थेच्या माहितीबाबत वा अन्य विविध बाबींचे फलक लावण्यात आलेले आहेत. बऱ्याच शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात आलेले फलक इंग्रजी भाषेत असून मराठी भाषेत फलक लावण्यात आलेले नाहीत, असे निदर्शनास आले आहे. तरी, या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.:-

(१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विना अनुदानित/कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था, तसेच तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्यात यावेत.

(२) ज्या ठिकाणी नामफलक इंग्रजी भाषेमध्ये लावण्यात आले आहेत तेथे सुध्दा सदर फलक इंग्रजी भाषेसह मराठी भाषेत लावणे आवश्यक राहील.

(३) सर्व संचालक व संबंधीत विद्यापीठे यांनी त्यांच्या अधिनस्त महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांना उपरोक्त सूचना आपल्या स्तरावरुन तात्काळ कळवाव्या. तसेच सर्व महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

२. उपरोक्त निर्देशांचे सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत संबंधित संस्थेचे प्राचार्य/ सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी वैयक्तिक लक्ष देऊन खात्री करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२००२१७१७३५१६३६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=abbed596652773468508d937a99472988ebdda28db8c543b79abe527c99646f6, cn=Satish Jagdeorao Tidke
Date: 2020.02.17 17:36:48 +05'30'

**( सतिश तिडके )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, जि. रायगड.
५. कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
६. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
७. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. संचालक, कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२. उप सचिव (विशि/मशि/तांशि/साशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (विशि-३).